# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
फोन नं. ०२२-२२६२०६६८, ६९, ७० फॅक्स: ०२२-२२६२०७८९ संकेत स्थळ: www.gdcmumbai.org

क्र.शादंमरुमुं/खरेदी विभाग/फिरते दंत वाहन/टायर खरेदी/ ८२३२ /२०१८ दिनांक १६ /१०/२०१८

प्रति,
मे..........

**विषय :-** मायक्लोस्टाईल मशिन मॉडेल क्र.DX2430 दुरुस्ती करुण मिळणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे नमूद सायक्लोस्टाईल मशिन मॉडेल क्र.DX2430 दुरुस्ती करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक असल्यास खालीलप्रमाणे नमूद करीताचे दरपत्रक कार्यालयात दि.२५/१०/२०१८ पुर्वी सादर करावेत. उशिरा आलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

| अनु. क्र. | मागणी प्रकार व विर्निदृष्टे | मागणी |
|---|---|---|
| १ | सायक्लोस्टाईल मशिन मॉडेल क्र. DX2430 दुरुस्ती<br>1)Wiring set for machine,<br>2) Separation Pad Assi.<br>3) Repair & Scanning Charges | <br>2 No.<br>1 No. |

वर दर्शविल्याप्रमाणे दरपत्रकेचा अनुक्रमांक व तारीख आणि बाबीचे नाव प्रती नग दर उल्लेखित केलेल्या मोहोरबंद लिफाफयातून पूर्ण भरलेल्या दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई-४००००१ या कार्यालयात दि.२५/१०/२०१८ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यन्त स्विकारल्या जातील. व दरपत्रकाचा सिलबंद लिफाफा खरेदी समिती समोर दि.२६/१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील आपणांस जर दरपत्रके उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये भाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहवे.

Sd/-
**अधिष्ठाता**
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

**अटी व शर्ती :-**

१) सदर सिलबंद दरपत्रक पाकीटावर विषय ठळकपणे नमुद करावे.

२) सदरील दरपत्रक अधिकृत लेटरहेड वर सादर करावे. त्यासोबत व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी नंबरची किंवा तत्सम प्राधिकरणाची नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत तसेच पॅनकार्डची प्रत, औषधीद्रव्ये विभागाची वैध मान्यता/परवानगी प्रमाणपत्र सदर सामुग्री पुरवठा करण्यास कंपनीने प्रधिकृत व वैध प्रमाणपत्र माहितीपत्रक (कॅटलॉग) इ. माहिती सादर करणे बंधनकारक आहे.

३) प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल.

४) दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावाच्या अधिन राहून असावेत. सदरचे वस्तूची निव्वळ किंमत व इतर सर्व कर हे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. तसेच उपरोक्त साहित्य हे पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त आठ (०८) दिवसांत पुरवठा करण्यात यावे. सदरील पुरवठा करण्यास विलंब झाल्यास देयकामधून नियमानुसार कपात करण्यात येईल.

५) उपरोक्त नमुद बाबी या विर्निदेशानुसार असणे आवश्यक असून, सामुग्री ही आयएसआय मार्क किवा तत्सम समान दर्जाची व उत्कृष्ट असणे आवश्यक आहे.

६) यंत्राची प्रत्यक्ष पहाणी करुन दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाचे दरपत्रक सादर करावे.

७) सदर बाबीसाठी कोण्यातीही वस्तुसाठी शासनाचे दरकरार उपलब्ध झाल्यास सदरील भरण्यात आलेले दरपत्रके वगळण्यात येतील यांची नोंद यावी,

८) संबधितकडून संबधित मागील अनुभव असल्यास त्याची प्रत सोबत साक्षांकित करुन देण्यात यावे.

९) दरपत्रक वरील यंत्राचा हमी (वॉरंटी) कालावधी नमूद करावा. तसेच सदर वस्तुचे नमुने तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

१०) शासकीय दुसर व चौथा शनिवार व रविवार,तसेच जोडुन आलेली सार्वजनिक सुटया वगळुन दरपत्रके सादर करण्यात यावे यांची नोंद घ्यावी. दरपत्रक पोस्टाने पाठविलेले स्विकारल्या जाणार नाहीत.

११) दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई यांना आहे.

१२) ज्या पुरवठादारांनी त्यांच्या दरपत्रकात नमूद बाबी करीता कमीत कमी दर आकरले असेल त्यांना खरेदी आदेश निर्गमीत करण्यात येतील याची सर्वानी नोंद घ्यावी.

१३) सविस्तर अटी व शर्ती वाचूनच दरपत्रके भरण्यात यावेत.